* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

## १७ व्या अमरावती परिक्षेत्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या तयारीचे मा. पोलीस अधिक्षक सो, वाशिम यांच्या कडुन आढावा

सन २०१९चा १७ वी अमरावती परिक्षेत्र पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन वाशिम येथे दिनांक ०५/०८/२०१९ ते ०७/०८/२०१९ दरम्यान पार पडणार आहेत. त्या अनुषंगाने पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी सो यांनी आज रोजी सर्व समित्यांच्या तयारीचा आढावा पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम येथे घेतला.

१७ व्या अमरावती परिक्षेत्र पोलीस कर्तव्य मेळावा वाशिम येथे पार पाडणार असुन सदर स्पर्धेमध्ये अमरावती परिक्षेत्रातील ०५ जिल्हे समाविष्ठ होणार आहेत त्यामध्ये अमरावती ग्रामिण, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्हयातील पोलीस अधिकारी कर्मचारी सहभागी होणार आहेत. सदर स्पर्धेमध्ये एकुण ०६ मुख्य विषयातील २१ प्रकारच्या स्पर्धा होणार असुन त्या मध्ये शास्त्रोत पद्धतीने तपास पध्दती, तपासामध्ये संगणकाचा वापर, श्वान पथक स्पर्धा, पोलीस फोटोग्राफी, पोलीस व्हिडीओग्राफी व बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या स्पर्धा होणार आहेत. सदर स्पर्धा उत्कृष्ठरित्या पार पाडण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी सो यांनी अपर पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार चव्हाण यांच्या नेतृत्वात एकुण ०८ समित्यांची दिनांक १६/०७/२०१९ रोजी स्थापना केली आहे. सदर समित्या कडे वेगवेगळया जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. सदर समित्याकडुन स्पर्धेची काय तयारी झाली आहे याचा आढावा आज मा. पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांनी घेतला. सदर आढावा बैठकीस उप विभागीय पोलीस अधिक्षक श्री पवन बनसोड व रमेश सोनुने व सर्व समित्याचे अध्यक्ष व सदस्य हजर होते. सदर बैठकीमध्ये विषयवार समित्यांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडुन कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याच्या सुचाना मा. पोलीस अधिक्षक सो यांनी दिल्या आहेत.

APC 23.07.19

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम